# जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

संपर्क क्र. - 02362- 228774 / 228770 / 228866 / 228496
जिल्हा परिषद मुख्य प्रशासकिय इमारत,पहिला मजला,ओरोस (मुख्यालय) सिंधुदुर्गनगरी ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग.
Email - coprisind@gmail.com / ssasindhudurg@gmail.com

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, ऑक्टोबर 11, 20011 /अश्विन 19, शके 1933 मधील तरतुदीनुसार

**नमुना दोन**

ग्राम :- ओरोस, सिंधुदुर्गनगरी.
दूरध्वनी :- 02362 228770
ई मेल :- eoprisind@gmail.com

जावक क्र. :- 5305 दि. 14/01/2026

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, जिल्हा - सिंधुदुर्ग

**शाळा मान्यता क्रमांक – S.F. 27330605202 दिनांक : 01/08/2025**

व्यवस्थापक :- **स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कुल, निरुखे कोलगांव,ता.सावंतवाडी जिल्हा- सिंधुदुर्ग.**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्यात येत असलेबाबत.**

**संदर्भ :- आपल्या शाळेकडील प्राप्त सुधारीत प्रस्ताव दिनांक 26/03/2025 नुसार.**

महोदय / महोदया,

आपल्या दिनांक-26/03/2025 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सावंतवाडी यांनी शाळेची केलेली तपासणी व त्याचप्रमाणे त्यांनी दिलेल्या अहवालाच्याआधारे मी श्रीम. **फारुखी अहमदी** फारुखी अहमदी दिनांक 06 मे 2025 पासून दिनांक 05 मे 2027 पर्यंत **तीन वर्षाच्या कालावधीसाठी** इयत्ता 1ली ते इयत्ता 8 वी करीता **स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कुल निरुखे कोलगांव,ता.सावंतवाडी ,जिल्हा- सिंधुदुर्ग** (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा, पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतू आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
   (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षण किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. ( परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल. )
   (सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.
   (आठ) शिक्षकांने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.
7. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
8. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.
10. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

खालील भौतिक सुविधांची तपासणी RTE Act 2009 मधील तरतुदी व शाळांमध्ये मुलभूत सुविधाबाबतचे निकष ठरविणेबाबतचा महाराष्ट्र शासनाचा शा.नि. दि.29 जुन 2013 नुसार करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| शाळेचे नांव | स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कुल, निरुखे कोलगांव ता.सावंतवाडी जिल्हा –सिंधुदुर्ग |
| शाळेचे माध्यम | इंग्रजी |
| शाळेचा प्रकार | स्वयंअर्थसहाय्यित / कायम विना अनुदानित |
| शाळेचा अभ्यासक्रम | सीबीएसई |
| शाळेच्या इयत्ता | 1 ली व 8 वी |

| इयत्ता 1 ते 5 | | | इयत्ता 6 ते 8 | | | इयत्ता 1 ते 8 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B | G | T | B | G | T | B | G | T |
| | | 206 | | | 27 | | | 233 |

| | तपशिल | पान क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | अणुक्रमणिका पान क्रमांकासह | 02 | |
| 2 | गटशिक्षणाधिकारी यांचे शिफारस पत्र | 03 | |
| 3 | शाळेचा मागणी अर्ज | 01 | |
| 4 | आरटीई ॲक्ट 2009 नुसार 1 ते13 निकष मुळ GPS फोटो त्यावर मुख्याध्यापक,गटशिक्षणाधिकारी यांची सही | आहे | |
| 5 | प्रस्तावित माहितीवर गटशिक्षणाधिकारी यांची सही | 04-05 | |
| 6 | यापूर्वीचे आरटीई प्रमाणपत्र नसेल तर खुलासा | पूर्वीचे प्रमाणपत्र आहे. | |

| क्र | भौतिक सुविधा | उपलब्धता | आवश्यकता | त्रुटी |
|---|---|---|---|---|
| 1 | एकूण बांधकाम क्षेत्र | 9080 चौ.मी | RCC बांधकाम | |
| 2 | शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | 2.99 एकर | | |
| 3 | खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | 1 एकर | किमान 648 चौ.मी व कमाल 2000 चौ.मी कमाल | |
| 4 | वर्गखोल्यांची संख्या | 12 | प्रत्येक वर्गासाठी | |
| 5 | एक वर्ग खोली | 258.33 स्क्वेअर फिट आहे | 499 स्क्वेअर फिट 30 मुलांमागे 1 मागे एक | |
| 6 | कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली | आहे. | असणे आवश्यक | |
| 7 | मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | शौचालय,मुतारी 10 मुलांसाठी<br>शौचालय,मुतारी 6 मुलींसाठी<br>आहे | 60 – 1( 2 मु. 1 शौ)<br>60 ते 120– 1( 3 मु. 1 शौ)<br>120 > 30 वि. 1 extra Uri.& 100 वि.1 toi. (B &G ) | |
| 8 | पिण्याच्या पाण्याची सुविधा | विहीरीवरुन पंपाव्दारे पाणी शाळेत टाकीमध्ये साठवून वापरले जाते | नळ जोडणी व कायम स्वरुपाची किंवा पिंप माठ यामध्ये साठवणूकीची व्यवस्था असावी. | |
| 9 | दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर. | नाही | | |
| 10 | अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता वाचन साहित्य विनासायास उपलब्ध | प्रस्तावात जोडलेले आहेत.<br>ग्रंथालयात 325 पुस्तके उपलब्ध आहेत. | असावे | |
| 11 | CWSN शौचालय | प्रस्तावात जोडलेले नाही - फोटो नाही | विशेष गरजा असणाऱ्या (cwsn) मुलां-मुलींसाठी एकत्रित असलेल्या शौचालयामध्ये कमोड पध्दतीचे भांडे,हॅंडरेल तसेच रॅम्पची व्यवस्था असावी | |
| 12 | संरक्षक भित (आवार भित) | प्रस्तावात जोडलेले आहे.- फोटो आहे | पक्की/तारेचे/काटयांचे व झाडे असावी. | |
| 13 | अग्नीशमन यंत्रे | प्रस्तावात जोडलेले नाही.-फोटो नाही | प्रत्येक शाळेत किमान दोन,किंवा प्रत्येक वर्गासाठी एक याप्रमाणे | |
| 14 | प्रथमोपचार पेटी | प्रस्तावात जोडलेले आहेत- फोटो आहे | शाळेसाठी एक असावी | |
| 15 | CCTV | सर्व वर्गात आहेत. | सर्व वर्गात असावेत | |
| 16 | तक्रार पेटी | आहे | असावी | |
| 17 | संगणक खोली | आहे | असावी | |
| 18 | प्रयोगशाळा | आहे | असावी | |
| 19 | उताराचा रस्ता ( रॅम्प ) | प्रस्तावात जोडलेले आहे. | 1 .2 रुंदी व 2फुट कठडे(Hand rail) असावे. | |
| 20 | शाळा मान्यता | प्रस्तावात जोडलेले आहेत- प्रती आहे | प्रत असावी | |
| 21 | प्रथम मान्यता | प्रस्तावात जोडलेले आहेत- प्रती आहे | प्रत असावी | |
| 22 | आरटीई मान्यता प्रमाणपत्र | आहे | प्रत असावी | |
| 23 | वर्ग व तुकडी वाढीस मान्यता आहे का ? | आहे (1 ली व 8वी पर्यंत आहे) | प्रत असावी | |
| 24 | संस्था रजिस्ट्रेशन1860 | प्रस्तावात जोडलेली आहे. | प्रत असावी | |
| 25 | संस्था रजिस्ट्रेशन 1950 | प्रस्तावात जोडलेली आहे. | प्रत असावी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | संस्थेचा PTR उतारा, संस्थेचे नियम व नियमावली (घटना) | प्रस्तावात जोडलेली आहे. | प्रत असावी | |
| 27 | शाळेचा भाडेपटटा, जमीनीचा नकाशा, शाळेचा नकाशा, शाळेचे लिज डीड, इंडेक्स उतारा, 7/12 उतारा | प्रस्तावात जोडलेले आहे. | प्रत असावी | |
| 28 | मागील तीन वर्षातील एकुण उत्पन्न व खर्च किंवा तुट | जोडण्यात आलेला आहे. | उल्लेख असावा व त्यासंबधी ऑडीट रिपोर्ट प्रती जोडणे. | |
| 29 | RTE 25 % प्रवेशाबाबत फी, प्रवेश व खर्च अहवाल | प्रस्तावात जोडलेले आहे. | माहिती पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक. | |
| 30 | विदयार्थी आधार कार्ड | 100 % | सरल पोर्टलवर नोंदणी 100 टक्के असणे आवश्यक | |
| 31 | वर्गनिहाय अभ्यासक्रमाचा आणि पाठय क्रमाचा तपशिल | जोडलेला आहे | तपशिल जोडणे आवश्यक | |
| 32 | विदयार्थ्यांची मुल्यमापन पध्दत | आकारीक व संकलित | सा.पु.स.मू.प. (cce) | |

वरील माहिती ही आपण सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती व गटशिक्षणाधिकारी किंवा त्यांचे क्षेत्रिय अधिकारी यांनी तपासलेली आहे.त्यांचा अहवालानुसार आपणास सदर RTE शाळा मान्यता देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.वरील माहिती मध्ये तफावत आढल्यास आपली ही RTE शाळा मान्यता रद्द करण्यात येवून आपल्या शाळेवर किंवा संस्थेवर योग्य ती प्रशासकिय कारवाई करण्यात येईल.

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता सांकेतांक **S.F. 27330605202** असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी. किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
19. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

14/1/26

**( फारुखी अहमदी )**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.**